नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/१०/२०२५ ( गुरूवार )**

---

## ड्रोन कॅमेऱ्या द्वारे पेट्रोलींग करून अवैधरित्या मोहाफुल दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १६ गुन्हे नोंद, जलालखेडा पोलीसांची कामगिरी ३ लाख ११ हजार १६० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक ०२/१०/२०२५ रोजी जलालखेडा पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की,जलालखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील उमठा ( पारधी बेडा), बानोरचंद्र (सिखबेडा), हिवरमठ आणि साखरखेडा येथे मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांच्या नेतृत्वात श्री तुषार चव्हाण, सपोनि , प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन जलालखेडा यांनी जलालखेडा पोलीस पथकासह जावुन **ड्रोन कॅमेऱ्याद्वारे पेट्रोलींग करून घटनास्थळी जावुन जेसीबी चा वापर करून जमीनीत गाडुन ठेवलेले मोहाफुल सडवा रसायन काढुन कारवाई केली**. नमुद कारवाईत आरोपी नामे १) रवी दादा पवार, वय ४२ वर्ष रा. उमठा,२) बलवानसिंग लडडुसिंग बावरी,वय ३३ वर्ष, रा. बानोरचंद्र (सिख बेडा) ,३) सोन्याजी शेरू पवार, वय २२ वर्ष, रा. उमठा ४) आशिष उदयभान दूधकवडे, वय २९ वर्ष, रा. घोगरा, ५) सलीम सुरेंद्र पवार, वय ३५ वर्ष, रा. उमठा,६) सद्या पुरुषोत्तम भोसले, वय ४० वर्ष, रा. उमठा आणि १० महीला आरोपी यांच्या ताब्यातुन पंचासमक्ष १) १०६० लिटर मोहाफुल दारू किंमती १,०६,०००/—रूपये, २) ६८०० लिटर मोहाफुल सडवा रसायन किंमती २,०३,०००/—रूपये आणि व ३) देशी दारू संत्र १८० मिली २७ निपा किंमती २१६० /— रूपये आणि इतर साहीत्य असा एकुण ३,११,१६०/— रूपयांचा मुद्देमाल मळून आल्याने

नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १६ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.











## पोलीस मुख्यालय ,नागपुर ग्रामीण, येथे विजयादशमी निमित्य करण्यात आले शस्त्र पुजन

आज दिनांक ०२/०१०/२०२५ रोजी विजयादशमी सणा निमित्य पोलीस मुख्यालय नागपुर ग्रामीण येथील शस्त्रगारामधील शस्त्रांचे पुजन करण्यात आले. सदर वेळी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील ,पोलीस उपधिक्षक गृह (प्रभारी), श्री संजय क्षीरसागर ,राखीव पोलीस निरीक्षक ,पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण यांच्यासह इतर अधिकारी आणि अंमलदार हजर होते.





# अवैध रित्या अंमलीपदार्थ गांजा आणि दारू बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद,

# नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक ०१/१०/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, पोलीस स्टेशन जलालाखेडा हद्दीत वार्ड क्र. ३ जलालखेडा येथे एक **महीला आरोपी** ही आपले रहाते घरी गांजा या अंमली पदार्थाची विक्री करीत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे नमुद पथकाने घटनास्थळी जावुन नमुद महीला आरोपीतांच्या घराची झडती घेतली असता २.१ किलो ग्रॅम वजनाचा गांजा सदृश्य पदार्थ मिळुन आला. **पोलीसांनी पंचासमक्ष २.१ किलो ग्रॅम गांजा किंमती २०,१००/—रूपये, ६ चिनी मातीच्या चिलम किंमती १००/—रूपये , ईलेक्ट्रॉनिक वनज काटे किंमती ५०००/—रूपये , संत्रा नं १ देशी दारुच्या १८० मिलीच्या ५४ नग बॉटल किमंत ४३२०/— रूपये आणि रोख रक्कम ५०४५/— रूपये असा एकुण ३४,५६५ /— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला.**

नमुद महीला आरोपीच्या विरूध्द पोलीस स्टेशन जलालखेडा येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## बेपत्ता अल्पवयीन बालकाचा तात्काळ घेतला शोध
## बोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बोरी** :— फिर्यादी नामे शाबीर बशिर शेख रा. फ्रेंड्स कॉलनी यांनी पोलीस स्टेशन बोरी येथे येऊन तक्रार दिली की त्यांचा मोठा मुलगा नावे शकील शेख, वय ९ वर्ष, हा दि.०१/१०/२५ रोजी सकाळी ११/०० वा. दरम्यान गोदावरी नगर, बुट्टी बोरी कडे खेळण्यास गिरीला होता परंतु खुप उशिर झाला तरी तो घरी परत आला नाही. फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे कलम १३७ (२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर घटेनेचे गांर्भिय लक्षात घेता मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आणि श्री दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांच्या नेतृत्वात बोरी पोलीसांनी तात्काळ नमुद अल्पवयीन बेपत्ता बालकाचा शोध घेतला. गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुरावे या आधारे नमुद बालकाचा शोध घेतला असता नमुद मुलगा वारंगा रोड येथे १२ तासाच्या आत सुखरूप मिळुन आला. नमुद बालक हा स्वत:च्या घराचा रस्ता चुकल्यामुळे भटकला होता. बालकाला त्याच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.




## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री तसेच वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध ४ गुन्हे नोंद, उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर आणि पथक यांची कामगिरी

दिनांक ०१/१०/२०२५ आणि दिनांक ०२/१०/२०२५ रोजी श्री सागर खरडे, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उपविभाग सावनेर यांना अवैध दारू बाबत गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली असता त्यांनी उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय सावनेर येथील अंमलदार यांना कारवाईचे आदेश दिले. नमुद पोलीस पथकाने खालील प्रमाणे कारवाई केली.

**पोलीस स्टेशन सावनेर :—** दिनांक ०१/०१०/२०२५ रोजी पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत नमुद पथकाने पहलेपार कडे जणाऱ्या छोटी पुलीया जवळ रोडवर नाकाबंदी केली असता एक विनाक्रमांकाची ग्रे रंगाची ज्युपीटर मोटर सायकल मिळुन आली. नमुद वाहनाची पाहणी केली असता देशी आणि विदेशी दारू मिळुन आली. नमुद आरोपी गजानन उर्फ सागर ईश्वर कोल्हेकर वय ३२ वर्ष रा. पहेपाार वार्ड क्र १६ सावनेर ता. सावनेर हा अवैधरित्या दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांची पंचासमक्ष देशी दारु भिंगरी संत्रा नं १८० मिली सिलबंध २

पेटी मध्ये एकुण ९६ निपा किमती ७६८० /— रूपये, रॉयल स्टॅग डिलक्स विस्की च्या १८० मिली ६८ निपा किमती १७००० /— रूपये आणि विनाक्रमांकाची ग्रे रंगाची ज्युपीटर दुचाकी वाहन किंमती ८०,०००/— रूपये असा एकुण किंमती १,०४,६८०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. तसेच दिनांक ०२/१०/२०२५ रोजी रिलॅाक्स बार , सावनेर च्या मागे आरोपी नामे तेजराव देवराव धापोडकर वय ३८ वर्षे,रा बाजर चौक, पाटणसांवगी हा अवैध रित्या देशी तसेच विदेशी दारू विक्री करीत असतांना मिळुन आल्याने त्याचे तब्यातुन आयकोनिक व्हाईट च्या १८० मिली च्या ०९ बॉटल आणि रॉयल स्टॅग च्या १०८ मिली च्या ०७ बॉटल असा एकुण ३,८२० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**पोलीस स्टेशन कळमेश्वरः—** दिनांक ०१/१०/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत नमुद पथकाने मोहपा ते लोहगड रोडवर नाकाबंदी केली असता एक होंडा सिबी शाईन मोटर सायकल क्रं एम एच ४९ ए एक्स २२१० मिळुन आली. नमुद वाहनाची पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. आरोपी नामे सावजी उर्फ मनोज दामोधर पांडे वय ४० वर्ष रा. मोहपा याचे ताब्यातुन पोलीसांची पंचासमक्ष देशी दारु भिंगरी संत्रा नं १८० मिली सिलबंध ४७ निपा किमती ३७६०/— रूपये, आणि होंडा सिबी शाईन मोटर सायकल क्रं एम एच ४९ ए एक्स २२१० किंमती ५०,०००/— रूपये असा एकुण किंमती ५३,७६०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

**पोलीस स्टेशन केळवद :—** दिनांक ०२/०१०/२०२५ रोजी पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत नमुद पथकाने मोजा जैतगढ येथील नयन ढाबा येथे रेड केली असता आरोपी नामे प्रविण चुडामनजी वाघ, वय ५० वर्षेरा वार्ड क्रं ४ केळवद याचे ताब्यातुन पोलीसांची पंचासमक्ष देशी दारु भिंगरी संत्रा नं १८० मिली सिलबंध ५० सिलबंद बॉटल किमती ४०००/— रूपये, आणि ९० मिली च्या ९६ सिलबंद बॉटल किंमती ३८४०/— रूपये असा एकुण किंमती ७८४०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

वरील कारवाईत एकुण १,७०,१००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

वर नमुद सर्व आरोपी विरूध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने